पादचाऱ्यांसाठी 'सब-वे'ची सुविधा

# मेट्रो ३ मधून उतरा आणि थेट मॉल गाठा!

लोकमत न्यूज़नेटवर्क

**मुंबई :** मेट्रो ३ च्या स्थानकांतून थेट मॉल गाठता येणे शक्य होणार असून, त्यानुसार नियोजन करण्यात आले आहे. मेट्रो ३ ची स्थानके भुयारी असून, ही स्थानके आता 'सब-वे'च्या माध्यमातून थेट जोडली जाणार आहेत. त्यामुळे खासगी आस्थापनांच्या कर्मचाऱ्यांसह प्रवाशांनाही त्याचा फायदा होणार आहे. आठ खासगी आस्थापने हे 'सब-वे' विकसित करणार आहेत.

मेट्रो ३ च्या २६ स्थानकांपैकी मरोळ नाका, बीकेसी, धारावी, वरळी आणि सायन्स म्युझियम ही सहा स्थानके ३२ कि.मी. लांबीची भुयारी कॉरिडोर आहेत. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) आरे ते बीकेसीपर्यंतचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ आणि कफ परेडपर्यंत पूर्ण मार्ग जुलै २०२४ पर्यंत सुरू करण्याचे नियोजन आखले आहे.

एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, साऊथ कोरियाच्या दौऱ्यादरम्यान मेट्रो स्थानके ते खासगी संस्था यांना जोडण्यासाठी 'सब-वे' असल्याचे आढळले. असाच प्रकल्प मुंबईतही राबवण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## खासगी आस्थापनांना करावा लागणार खर्च

- अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे काम एमएमआरसी करणार असले तरी यासाठी लागणारा खर्च खासगी आस्थापनांकडून केला जाणार आहे.



- विविध आस्थापनांकडून एकाच 'सब-वे'चा वापर करण्यात येईल आणि या 'सब-वे'साठी लागणारा देखभाल व दुरुस्ती खर्च संबंधित विकासकांना करावा लागणार आहे.
- अधिकाऱ्यांनी सांगितले, खासगी आस्थापनांवर आर्थिक ताण येणार नाही, असे नियोजन करण्यात आले आहे.